नि. दि. दावा क्र. ३००-२०२३
निशाण क्र.४६ ची पुरवणी

**<u>प्रतिवादी यांचे साक्षीदार क्र. २ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. डी.आर.देसाई यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी रमेश व माझे माघील १० ते १२ वर्षापासुन मैत्रीचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दादा करे हे केडगांव येथील रहिवाशी आहेत. हे मला सांगता येणार नाही की, जमनाबाई या केडगांव येथे त्यांचे घरी राहतात व दादा करे हे केडगांव येथे राहतात परंतू त्यांचा घर क्रमांक मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, जमनाबाई ही दादा करे यांची सख्खी चुलती आहे. हे मला माहिती नाही की, जमनाबाई हीस अपत्य आहे किंवा कसे. जमनाबाई ही मयत आहे. हे मला माहिती नाही की, जमनाबाई यांचे पती दिगंबर हे भारतीय सैन्य दलामध्ये नोकरीस होते किंवा कसे. हे मला माहिती नाही की, जमनाबाई यांचे पती दिगंबर हे सैन्य दलामध्ये नोकरी करत असताना शहीद झाले किंवा कसे.

वादातित मिळकत ही जमनाबाई यांना शासनाकडुन मिळालेली आहे. मला सांगता येणार नाही की, ती जमिन जमनाबाई यांना शासनाकडून केंव्हा मिळाली. जमनाबाई यांना वादग्रस्त मिळकत शासनाकडुन मिळालेबाबत मी दस्त पाहिलेला नाही. जमनाबाई बाई व माझी वैयक्तीक ओळख नाही. रमेश व जमनाबाई यांचेमधील व्यवहार हा मार्च २००५ मध्ये झाला. खरेदी होण्यापूर्वी मिळतीचे साठेखत झालेले नव्हते. जमनाबाई यांनी दि. १५-०३-२००५ रोजी रमेश गोडगे यांना खरेदी दिली. खरेदी पोटी किती रक्कम रमेश याने जमनाबाई यांना दिली ही बाब माझे सरतपासात नमुद नसण्याचे कारण मी सांगू शकत नाही. खरेदी खताच्या दिवशी रमेश याने जमनाबाई यांना दुय्यम निबंधकासमोर रक्कम दिली. दुय्यम निबंधकासमोर रमेश यांनी जमनाबाई यांना १,६०,०००/- रुपये दिले. सदर १,६०,०००/- दुय्यम निबंधकासमोर दिल्याची बाब खरेदी खतामध्ये नमुद आहे. सदर १,६०,०००/- रोख स्वरुपात जमनाबाई यांना दिली. हे म्हणणे खरे आहे की, जमनाबाई वयोवृध्द होती व तीस लिहिता वाचता येत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जमनाबाई ही वयोवृध्द व निरिक्षर असल्यामुळे तीस जमिनीचा गट नंबर व इतर बाबी माहित नव्हत्या. खरेदीचा दस्त प्रदिप केशव वीर यांनी लिहिला. हे म्हणणे खरे आहे की, प्रदिप वीर यांनी ७/१२ प्रमाणे दस्त तयार केला. हे मला सांगता येणार नाही की, खरेदी वेळी ७/१२ उतारा रमेश गोडगे यांनी आणला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीचा दस्त लिहिले नंतर प्रदिप वीर यांनी जमनाबाई हिस बोलावून तिचा अंगठा लावून घेतला. माझे प्रतिज्ञापत्रात जमनाबाई यांनी अंगठा लावल्याचे नमुद केले आहे. मला खरेदी खतातील मजकुर सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, माझे पुराव्याच्या शपथपत्रात सदरचा दस्त लिहिणार दस्तुर यांचे समक्ष लिहून देणार व घेणार

व आम्ही चार लोक यांनी सहया केल्याचे का नमुद केले नाही हे मला सांगता येणार नाही. हे मला माहिती नाही की, जमनाबाई यांना शासनाकडुन मिळालेल्या जमिनीचा आदेश खरेदी खतात दाखल केला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी खतातील मजकुर लिहून देणार यांनी सांगितलेला नव्हता. वादग्रस्त मिळकतीचे खरेदी खत होण्यापूर्वी वादग्रस्त मिळकतीचा ७/१२ पाहिलेला नव्हता. वादग्रस्त मिळकतीचा गट नं. २८६ असा आहे.

खरेदी खताच्या वेळी वादमिळकत ही जिराईत स्वरुपाची होती. खरेदी खतातील मजकुर *" सदर जमिनीचे ७/१२ पत्रकी इतर हक्कात 'सररकार नियंत्रीत सत्ता प्रकार' अशी असल्याची जाणीव तुम्हाला व मला मे. दुय्यम निबंधक करमाळा यांनी दिली आहे"* हे खरे व बरोबर आहे. हे मला माहिती नाही की, वरील प्रमाणेनोंद असेल तर सक्षम अधिकारी यांचे परवानगी शिवाय दस्त होतो किंवा कसे. खरेदी झालेनंतर रमेश यास कब्जा दिला. जमनाबाई यांचेकडुन रमेश यांनी वादग्रस्त मिळकतीचा कब्जा घेतलेबाबत कब्जेपावती करुन घेतलेली नव्हती. मी खरेदी नंतर वादग्रस्त मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. हे मला माहिती नाही की, खरेदी पासुन खरेदीचा अंमल महसुल दप्तरी झाला किंवा कसे. खरेदी नंतर रमेश गोडगे जमिन वहिवाट करत असलेबाबतची दस्तऐवजीय नोंद मी पाहिलेली नाही. साक्षीदार सांगतो, प्रत्यक्षात मी रोजच पाहतो. हे मला सांगता येणार नाही की, दादा करे यांचेकडे कोणतेही वाहन आहे किंवा कसे. मला त्यांचे कडे वाहन नसलेबाबत माहिती असतानाही त्या वाहनाचा क्रमांक माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी खतावेळी दादा करे आलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी खतावेळची दादा करे यांची स्वाक्षरी माझे समक्ष झालेली नव्हती.

प्रश्न – रमेश गोडगे यांनी दादा शिवा करे व्यक्ती दर्शिविण्यासाठी बनावट व्यक्ती आणुन स्वाक्षरी करुन घेतली.

उत्तर – माझे समक्ष दादाने स्वाक्षरी केली.

प्रश्न – दादा यांनी स्वाक्षरी केली ही बाब दर्शिविणारा तुमच्या पुराव्याशिवाय इतर कोणताही आधार नाही.

उत्तर – खरेदी खत आहे.

महादेव ढाणे, साहेबराव मारकड हे दोघेही सध्या जिवंत आहेत. आम्ही साक्षीदार म्हणुन स्वाक्षरी या दुय्यम निबंधक करमाळा यांचे समक्ष केल्या. खरेदी खता वेळी माझे ओळखतीचे अस्तित्व दाखविणेसाठी ओळखपत्र दिले होते. हे मला सांगता येणार नाही की, आमची चौघांची ओळखपत्र खरेदी खतावेळी जोडलेली आहेत किंवा कसे. जमनाबाई रमेश यांना खरेदी खत करुन देणार आहे या बाबीची माहिती दादा करे यांना दिलेली होती. त्या बाबतीत दादा करे यांना लेखी नोटीस दिलेली नव्हती. हे म्हणणे

खरे नाही की, जमनाबाई या वयोवृध्द व निरिक्षर असल्याचे गैरफायदा घेवून प्रतिवादी व आम्ही साक्षीदार लोकांनी खोटा व बनावट खरेदी दस्त तयार केलेला आहे.

गट नं. २८६ या गटाचे एकूण ०१हे. ०७आर. आहे. हे मला माहिती नाही की, गट नं. २८६ मधील एकूण क्षेत्र १६हे. २४आर. आहे किंवा कसे. मला त्या गटातील खातेदार व धारकदार माहित नाही. साक्षीदार सांगतो की, मला नजरेमुळे वाचता येत नाही. मी जमनाबाई यांचेकडे गट नं. २८६ पैकी पश्चिमेकडील मधली जमिन होती हे दर्शिविणारा शासकीय पुरावा पाहिलेला नाही. जमनाबाई यांना महाराष्ट्र शासनाने ०१हे.०७आर. जमिन दिलेबाबतचा कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी घेतलेल्या मिळकती बाबत मला माहिती असल्याचे मी खोटे नमुद केलेले आहे. गट नं. ११३/७ व ११३/८ हा माझे मालकीचा असलेबाबतचा ७/१२ उतारा प्रतिज्ञापत्रा सोबत जोडलेला नाही. गट नं. ११३/७ व ११३/८ हा गट नं. २८६ जवळ असलेबाबत भूमिअभिलेख यांचा नकाशा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मालक नसलेमुळे मी त्या गटाचा दस्त दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी खतातील नमुद रक्कम जमनाबाई यांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमनाबाई यांनी दावा मिळकतीचा कब्जा रमेश गोडगे यांना कधीही दिलेला नव्हता व नाही. हे मला सांगता येणार नाही की, जमनाबाई यांचे मृत्युनंतर दादा करे हा एकमेव तिचा वारस आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पुराव्याचे शपथपत्र माझे विधिज्ञांनी तयार करुन मी त्यावर स्वाक्षरी केली व दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याच्या शपथपत्राबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, रमेश गोडगे यांच्या मैत्री पोटी मी पुराव्याचे बनावट प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि. ०४–०७–२०२५